दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आजचे पंचांग

वार : शनिवार माह (अमावस्यांत) : आश्विन माह (पूर्णिमांत) : कार्तिक ऋतु : हेमंत आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : षष्ठी तिथी (सायंकाळी ०४:५७ पर्यंत), त्यानंतर सप्तमी तिथी नक्षत्र : आर्द्रा नक्षत्र (सकाळी ०७:११ पर्यंत), त्यानंतर पुनर्वसू नक्षत्र योग : सिद्ध योग (सायंकाळी ०५:३१ पर्यंत), त्यानंतर साध्य योग करण : वाणिज करण (सायंकाळी ०४:५७ पर्यंत), त्यानंतर विष्टी (भद्रा) करण चंद्र राशी : मिथुन राशी (रात्री ११:५९ पर्यंत), त्यानंतर कर्क राशी

नीट-पीजी पेपरफुटी प्रकरणात मोठी सुनावणी

पुणे । प्रतिनिधी

नीट-पीजी २०२६ परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) केलेल्या कारवाईनंतर आता न्यायालयाच्या निर्णयाकडे लक्ष लागले आहे. राऊस अव्हेन्यू न्यायालयाने आरोपींविरुद्ध आरोप निश्चित करण्याबाबतचा आदेश राखून ठेवला असून, १८ नोव्हेंबर रोजी निर्णय सुनावला जाणार आहे. या प्रकरणात एकूण १४ जणांना आरोपी करण्यात आले आहे. सीबीआयने मे महिन्यात या प्रकरणाचा तपास सुरू केला.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ | वर्ष - २ | अंक - ३७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

उत्तर प्रदेश मतदार यादी पुनरीक्षण : बनावट 'फॉर्म ७' प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश; निवडणूक आयोगाच्या उत्तरदायित्वावर प्रश्न उपस्थित

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
नवी दिल्ली / प्रतिनिधी

उत्तर प्रदेशातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणादरम्यान (SIR) मोठ्या प्रमाणावर जमा केलेले 'फॉर्म ७' बनावट असल्याचे भारतीय निवडणूक आयोगाने (एउख) सर्वोच्च न्यायालयात मान्य केले आहे. न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत आयोगाला सुधारणात्मक उपाययोजना करण्याचे आणि अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या गैरप्रकारांनंतर केवळ औपचारिक निर्देश देण्यावर समाधान न मानता, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या प्रशासकीय उत्तरदायित्वावर आणि संस्थात्मक कारवाईवर विरोधी पक्षांनी व याचिकाकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

प्रकरणातील प्रमुख कायदेशीर आणि धोरणात्मक मुद्दे:

प्रशासकीय निष्काळजीपणा की संस्थात्मक अपयश: 'फॉर्म ७' चा वापर मतदार यादीतून नावे वगळण्यासाठी केला जातो. हजारो बनावट फॉर्म सादर होऊनही त्यावर वेळेत प्रतिबंधात्मक कारवाई न झाल्याने निवडणूक आयोगाच्या पडताळणी यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशिष्ट समुदायांना लक्ष्य केल्याचा आरोप: एकाच मतदारसंघात विशिष्ट समुदायाविरोधात ३२ फॉर्म सादर होणे आणि त्यावर बूथ पातळीवरील अधिकाऱ्यांच्या (BLO) स्वाक्षऱ्या आढळणे, यावरून प्रक्रियेतील पारदर्शकतेवर याचिकाकर्त्यांनी शंका उपस्थित केली आहे.



मुख्य निवडणूक आयुक्तांच्या जबाबदारीचा मुद्दा: सर्वोच्च न्यायालयात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीविरोधात याचिका प्रलंबित असताना, अशा बनावट अर्जांवर केवळ अर्ज फेटाळण्यापलीकडे जाऊन दोषींवर गुन्हेगारी स्वरूपाची कारवाई का केली नाही, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

न्यायालयाची भूमिका आणि इतर राज्यांतील स्थिती: सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेशातील त्रुटींची त्वरित पडताळणी करण्याचे निर्देश दिले आहेत. याशिवाय छत्तीसगडमधील नावे वगळण्याच्या आरोपांवर आयोगाकडून ४ आठवड्यांत सविस्तर प्रतिज्ञापत्र मागवले असून केरळबाबत सहानुभूतीपूर्वक पुनर्विचार करण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायालयाच्या या हस्तक्षेपामुळे मतदार याद्यांची सुचिता राखण्याचे आव्हान उभे राहिले असले, तर दुसरीकडे निवडणूक प्रक्रियेतील गैरप्रकारांना जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर संस्थात्मक कारवाई कधी होणार, याकडे लक्ष लागले आहे.

विशाखापट्टनम डेटा सेंटर प्रकरण : पर्यावरण आणि नियामक त्रुटींवरून केंद्र सरकारपुढील आव्हाने अधिक तीव्र

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
नवी दिल्ली / विशाखापट्टनम

विशाखापट्टनम येथील १७,७०० कोटींच्या गुगल-अदाणी मेगा डेटा सेंटर प्रकल्पाच्या पर्यावरणीय मंजुरीतील त्रुटींवर राष्ट्रीय हरित प्राधिकरणाने (NGT) बोट ठेवल्यामुळे, उद्योगस्नेही धोरणे आणि पर्यावरण संरक्षण यांमधील संतुलनावरून केंद्र सरकारसमोर राजकीय व धोरणात्मक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

प्रकल्पाला केवळ 'इमारत आणि बांधकाम' श्रेणीत गृहीत धरून दिलेली मंजुरी, स्थानिक नागरिकांशी न झालेली सार्वजनिक सल्लामसलत, आणि सर्व्हेर्समुळे निर्माण होणारी उष्णता, ई-कचरा व बॅटरी कचऱ्यासारख्या गंभीर घटकांकडे झालेले दुर्लक्ष यांवर NGT ने तीव्र ताशेरे ओढले आहेत. प्राधिकरणाने या प्रकरणी केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाला (MoEFCC) पक्षकार करून घेत २० नोव्हेंबर २०२६ पर्यंत स्पष्टीकरण मागवले आहे.

राजकीय व धोरणात्मक दृष्टीने महत्त्वाचे मुद्दे:

* 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस' विरुद्ध पर्यावरण नियमन: केंद्र सरकारच्या 'डिजिटल इंडिया' आणि मोठ्या परदेशी गुंतवणुकीच्या धोरणांसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जातो. मात्र, नियमांचे पालन न करता जलद गतीने दिलेल्या मंजुऱ्यांवर न्यायव्यवस्थेने प्रश्न उपस्थित केल्याने सरकारच्या प्रशासकीय पारदर्शकतेवर टीका होत आहे.



* इको-सेन्सिटिव्ह झोन आणि पर्यावरण रक्षण: हा प्रकल्प कंबालकोंडा वन्यजीव अभयारण्यापासून अवघ्या ७५० मीटर अंतरावर असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. पर्यावरणविषयक मानकांचा संकोच करून उद्योगपूरक निर्णय घेतले जात असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जाण्याची शक्यता आहे.

* अदाणी समूहाशी जोडलेले प्रकल्प आणि राजकीय संवेदनशीलतेचा मुद्दा: अदाणी समूहाच्या सहभागामुळे या प्रकरणाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले असून, विरोधी पक्ष या मुद्द्यावरून सरकारवर नियामक संस्थांच्या शिथिलतेचा आरोप करण्याची शक्यता नाकारता येत नाही. NGT ची पुढील सुनावणी ७ डिसेंबर २०२६ रोजी होणार आहे. पर्यावरण मंत्रालयाच्या उत्तरानंतर या प्रकल्पाचे भविष्य स्पष्ट होईल. मात्र, आर्थिक विकास साध्य करताना पर्यावरणाचा समतोल राखण्याचे आव्हान पुन्हा एकदा केंद्र सरकारसमोर उभे ठाकले आहे.

नफ्यातील सरकारी बँकही विक्रीला! देश उभारणाऱ्या संस्थांचा मोदी सरकारला बाजार मांडायचा आहे?

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
नवी दिल्ली : प्रतिनिधी

सार्वजनिक क्षेत्रातील बँका या सरकारच्या विक्रीसाठी ठेवलेल्या मालमत्ता नाहीत, तर देशाच्या आर्थिक उभारणीची महत्त्वाची साधने आहेत, अशा शब्दांत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आयडीबीआय बँकेच्या निर्गुंतवणुकीवर केंद्र सरकारला लक्ष्य केले आहे. नफ्यात चालणारी सरकारी बँक विकण्याची गरज काय, असा थेट सवाल उपस्थित करत त्यांनी बँकेच्या कर्मचाऱ्यांना आणि ठेवीदारांना पाठिंबा दर्शवला आहे.

३० ऑक्टोबर २०२६ रोजी राहुल गांधी यांनी या मुद्द्यावर सरकारच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी सांगितले की, आयडीबीआय बँकेच्या विक्रीचा मुद्दा आपण लोकसभेत उपस्थित केला होता. नफ्यात असलेली सार्वजनिक क्षेत्रातील बँक विकण्यामागचे कारण काय? या व्यवहारानंतर बँकेतील कर्मचाऱ्यांचे आणि ठेवीदारांचे हित कसे सुरक्षित ठेवले जाणार? असे प्रश्न आपण सरकारला विचारले होते. मात्र, सरकारकडून त्यावर कोणतेही ठोस कारण देण्यात आले नाही, असा आरोप त्यांनी केला.

आता कॅनडास्थित फेअरफॅक्स कंपनीला आयडीबीआय बँक विकण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. त्यामुळे सार्वजनिक बँकांच्या खासगीकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

सरकारच्या निर्गुंतवणूक धोरणावर मूलभूत प्रश्न उपस्थित होत आहे. बँक नफ्यात असेल, तर तिची मालकी खासगी हातात देण्याची घाई कशासाठी? सार्वजनिक बँका केवळ आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्था नसून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, लघुउद्योजक आणि मध्यमवर्गाला आर्थिक आधार देणारी व्यवस्था आहेत. खासगीकरणातून सरकारला किती आर्थिक फायदा होणार, कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांचे काय होणार आणि ठेवीदारांच्या हिताची हमी कोण देणार, या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे अद्याप अपेक्षित आहेत.

टायगर श्रॉफ गोळीबारामागे पैशांचे मोठे जाळे! सुपारीची रक्कम अनेक खात्यांतून फिरवली

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
मुंबई / प्रतिनिधी

अभिनेता टायगर श्रॉफशी संबंधित गोळीबार प्रकरण आता केवळ गुन्हेगारांच्या टोळीपुरते मर्यादित राहिलेले नाही. गोळीबार घडवून आणण्यासाठी सुपारीचे पैसे नेमके कोणी पुरवले, त्यांचे आर्थिक नियोजन कुणी केले आणि या कटामागे आणखी कोणते चेहरे आहेत, याचे धागेदोरे मुंबई गुन्हे शाखेच्या हाती लागण्यास सुरुवात झाली आहे. हरियाणातील अमन याला अटक करण्यात आल्याने या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या १२ झाली आहे. अमन हा हरियाणातील रोहाना गावचा रहिवासी आहे. सुपारीची रक्कम त्याच्या बँक खात्यात जमा झाल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी खरखोडा येथे सापळा रचून त्याला पकडले. रोहाना येथील कुणाल संजय याने अमनच्या खात्यात ही रक्कम जमा केल्याचे तपासात उघड झाले आहे. विशेष म्हणजे, सुपारीचे पैसे एका खात्यातून थेट न पाठवता अनेक बँक खात्यांमधून फिरवण्यात आल्याचा संशय आहे. विविध खात्यांमधून प्रत्येकी पाच हजार रुपयांचे व्यवहार झाल्याचे पोलिसांना आढळले आहे. गुन्ह्याच्या पैशांचा मूळ स्रोत लपविण्यासाठी ही पद्धत वापरली गेली का, याचा तपास सुरू आहे. पैसे देणारे, स्वीकारणारे आणि व्यवहारांची साखळी उभी करणारे सूत्रधार शोधण्यावर गुन्हे शाखेचा भर आहे. दरम्यान, उर्वरित ११ आरोपींना विशेष मकोका न्यायालयाने ६ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. मकोका लागू झाल्यानंतरची ही पहिली रिमांड सुनावणी ठरली. आता गोळीबाराच्या कटामागील आर्थिक सूत्रधारांचे चेहरे उघड होतात का, याकडे लक्ष लागले आहे.

ई-केवायसीच्या घोळाने ८१ लाख लाडक्या बहिणींचा हप्ता अडकला; आता सरकारला जाग!

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
मुंबई / प्रतिनिधी

लाडकी बहीण योजनेचा गाजावाजा करणाऱ्या राज्य सरकारच्या कारभारामुळे तब्बल ८१ लाख महिला आर्थिक लाभापासून वंचित राहिल्याचा गंभीर प्रश्न समोर आला आहे. ई-केवायसीच्या तांत्रिक अडचणी, कागदपत्रांची पूर्तता आणि प्रशासकीय गोंधळामुळे आदिवासी व गरीब कुटुंबांतील महिलांचे हसे रखडले. आता या महिलांना १,५०० रुपयांचा सन्माननिधी देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याची माहिती समोर आली आहे.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर अखिल भारतीय किसान सभेच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीत हा प्रश्न ऐरणीवर आला. शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या मागण्यांसोबतच किसान सभेने ई-केवायसीच्या नावाखाली महिलांना लाभापासून वंचित ठेवण्याच्या प्रकारावर सरकारला जाब विचारला.

या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, पाच महत्त्वाच्या खात्यांचे मंत्री आणि विविध विभागांचे सचिव उपस्थित होते. ई-केवायसी पूर्ण न झालेल्या पात्र महिलांच्या खात्यात पैसे जमा करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे सांगण्यात येत आहे. बंद पडलेले संकेतस्थळ पुन्हा सुरू करून ई-केवायसीची सधी देण्याची तयारी प्रशासनाकडून केली जात आहे.

दुष्काळात शेतकऱ्यांना दिलासा; मग बेकायदा सावकारांवर कायद्याचा बडगा कधी?

परवान्याशिवाय दिलेल्या कर्जाच्या वसुलीला सर्वोच्च न्यायालयाचा चाप; कर्जदारांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण कायदेशीर भूमिका

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
मुंबई : वृत्तसंस्था

दुष्काळ पडला की शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सरकारकडून घोषणा होतात. कर्जाचा डोंगर, हातात उत्पन्न नाही, जनावरांच्या चाऱ्याची चिंता आणि घरखर्चासाठी खासगी सावकारांच्या दारात जाण्याची वेळ अशा दुहेरी संकटात ग्रामीण भागातील शेतकरी अडकतो. एकीकडे निसर्गाची अवकृपा, तर दुसरीकडे कर्जाच्या बदल्यात अवाजवी व्याज आणि वसुलीचा तगादा, अशी त्याची अवस्था होते. अशा परिस्थितीत परवान्याशिवाय सावकारी करणाऱ्यांविरोधात सर्वोच्च न्यायालयाने घेतलेली भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. मात्र, प्रश्न एवढाच की, शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटाची दखल घेण्यासाठी दुष्काळ जाहीर होण्याचीच वाट का पाहिली जाते? बेकायदा सावकारी आणि कर्जदारांची पिळवणूक रोखण्यासाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी नेहमीच का होत नाही?

सर्वोच्च न्यायालयाने २९ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्रातील परवानाविरहित सावकारीच्या प्रश्नावर महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण दिले. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ नुसार प्रॉमिसरी नोटच्या आधारे व्याजाने दिलेले कर्जही सावकारीच्या व्याख्येत येते. त्यामुळे वैध परवाना नसताना अशा प्रकारे दिलेले कर्ज कायदेशीररीत्या वसूल करता येण्यायोग्य ठरत नाही. परिणामी, अशा कर्जाच्या परतफेडीसाठी दिलेला धनादेश वटला नाही, तर केवळ चेक बाउन्स झाल्याच्या आधारावर परवानाविरहित सावकाराला परक्राम्य लेख अधिनियमाच्या कलम १३८ अंतर्गत खटला चालविण्याचा अधिकार आपोआप मिळत नाही.

मे २०२६ मधील 'एम/एस मानसी फायनान्स विरुद्ध एम. ललिता' या प्रकरणातील निर्णय संपूर्ण देशासाठी सरसकट लागू होणारा पूर्वनिर्णय मानता येणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. कारण त्या प्रकरणात तामिळनाडूतील कायद्याचा संदर्भ होता, तर महाराष्ट्रातील कायद्यात प्रॉमिसरी नोटवर दिलेले व्याजाचे कर्ज सावकारीच्या कक्षेत येते. महाराष्ट्रातील अशा प्रकरणांत संबंधित न्यायालयाने सुरुवातीलाच सावकाराकडे वैध परवाना आहे का, याची पडताळणी करणे आवश्यक आहे. हा मुद्दा संबंधित खटल्यातील परिस्थिती आणि कायदेशीर युक्तिवादाच्या आधारे न्यायालयाने तपासायचा आहे.

या निर्णयाचा खरा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. सावकारीचा व्यवसाय करायचा असेल तर कायद्याने ठरवून दिलेल्या अटींचे पालन करणे बंधनकारक आहे. केवळ प्रॉमिसरी नोट किंवा धनादेश हातात आहे म्हणून कर्जदारावर कोणतीही वसुली लादता येणार नाही. कर्जदाराला कायदेशीर संरक्षण मिळणे हा त्याचा अधिकार आहे. मात्र, या संरक्षणाचा प्रत्यक्ष लाभ ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी, शेतमजूर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्जदारांपर्यंत पोहोचणार कसा, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे.

दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांना कर्जमाफी, मदत आणि अनुदानाच्या घोषणा केल्या जातात. परंतु दुष्काळ नसतानाही शेतकरी आर्थिक संकटात नसतो का? पीक हातचे गेले, बाजारभाव कोसळले, मुलांच्या शिक्षणासाठी किंवा आजारपणासाठी कर्ज घ्यावे लागले, तर अशा वेळी कर्जदाराचे संरक्षण करण्याची जबाबदारी कोणाची? बेकायदा सावकारीविरोधातील कायदा केवळ कागदावर राहिला, तर सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेचा सामान्य माणसाला प्रत्यक्ष फायदा कसा मिळणार?

त्यामुळे जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि सावकारी परवाना देणाऱ्या संबंधित विभागांनी परवानाधारकांची नोंदणी, बेकायदा सावकारीच्या तक्रारी आणि अवाजवी व्याजाच्या वसुलीची पद्धत यांची प्रभावी तपासणी करणे आवश्यक आहे. केवळ तक्रार आल्यानंतर कारवाई करण्याऐवजी ग्रामीण भागात जनजागृती आणि तक्रार निवारणाची यंत्रणा सक्षम करावी.

न्याय हा दुष्काळी मदतीसारखा हंगामी विषय नाही. तो प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. सावकार असो वा कर्जदार, कायद्यापुढे दोघेही समान आहेत. मग शेतकऱ्याला कर्जाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी आणखी किती संकटांची प्रतीक्षा करायची? बेकायदा सावकारी रोखण्याचा कायदा अस्तित्वात असताना त्याची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी दुष्काळाची गरजच का भासावी?

संपादकीय

शून्याचा सोयीस्कर जल्लोष आणि वास्तवाचे विस्मरण!

विधान परिषदेच्या निवडणुका म्हणजे मतदारांची मर्यादित संख्या आणि मोजकेच मतदारसंघ. परंतु, या निवडणुकांना भाजपने दिलेले महत्त्व पाहता, जणू काही देशाचे भवितव्य याच निवडणुकांवर अवलंबून आहे, असा आव आणला जातो. प्रत्येक निवडणुकीत विरोधकांना, विशेषतः काँग्रेसला चितपट करण्याचा विडा उचलायचा आणि निकालानंतर आपल्या विजयाचा मोठा गाजावाजा करायचा, हा शिरस्ता बनला आहे. मात्र, या राजकीय आतषबाजीत भाजपच्या पदरी आलेले अपयश आणि विरोधकांनी दिलेले धक्के कसे सोयीस्करपणे झाकले जातात, याचे उत्तम दर्शन अलीकडील विधान परिषद निकालांनी घडवले आहे.

उत्तर प्रदेशात विधान परिषदेच्या ११ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपला ६, तर समाजवादी पक्षाला ५ जागा मिळाल्या. काँग्रेसच्या वाट्याला एकही जागा आली नाही, हे सत्य आहे. पण या निकालाचा एकमेव अर्थ 'काँग्रेसचा पराभव' असाच काढायचा का? समाजवादी पक्षाने तब्बल ५ जागा जिंकत सत्ताधारी पक्षाला दिलेली कडवी टक्कर आणि खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी लोकसभा मतदारसंघात भाजपलाच झालेला पराभव, या वास्तवाकडे डोळेझाक कशी चालणार? भाजपच्या ६ जागांचा जल्लोष मोठा की समाजवादी पक्षाचा हा जोरदार धक्का, याचे आत्मपरीक्षण विरोधकांसोबतच सत्ताधाऱ्यांनीही करायला हवे.

बिहारमधील आठ जागांच्या निवडणुकीत भाजपला केवळ तीन जागांवर समाधान मानावे लागले, तर उर्वरित जागांवर इतरांनी बाजी मारली. कर्नाटकात चारपैकी तीन जागा भाजपने जिंकल्या आणि एक जागा जेडीएसच्या वाट्याला आली, तर काँग्रेसला पुन्हा रिकाम्या हाती राहावे लागले. काँग्रेससाठी हा नक्कीच चिंतेचा विषय आहे; परंतु भाजपनेही या निकालांकडे केवळ काँग्रेसच्या अपयशाच्या चष्ट्र्यातून पाहण्याऐवजी बदलत्या राजकीय समीकरणांचे आकलन करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रात तर निकालाचे चित्र सत्ताधाऱ्यांना आत्मपरीक्षण करायला लावणारे आहे. विधान परिषदेच्या पाच जागांपैकी महाविकास आघाडीने तीन जागांवर आपला झेंडा फडकवला, तर सत्ताधाऱ्यांना केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दोन जागा जिंकून आपली ताकद पुन्हा सिद्ध केली. यातही सर्वांत लक्षवेधी ठरला तो नागपूरचा निकाल! उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्य ठिकाण असलेल्या नागपूरमध्ये काँग्रेसने मिळवलेला विजय हा भाजपसाठी केवळ एका जागेचा पराभव नाही, तर तो त्यांच्या बालेकिल्ल्यात विरोधकांनी दिलेला अत्यंत गंभीर राजकीय इशारा आहे.

थोडक्यात सांगायचे तर, काँग्रेसला शून्य जागा मिळाल्या म्हणून जल्लोष साजरा करताना वाराणसीतला पराभव, नागपुरातील धक्का, उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाची मुसंडी आणि महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे बहुमत याकडे दुर्लक्ष करणे हा विजयाचा उत्सव नव्हे, तर निवडक आकडे पुढे करून राजकीय वास्तव झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न ठरतो. लोकशाहीत प्रत्येक निकालाचा अन्वय अर्थ लावला जातो, पण तो आपल्या सोयीनुसार बदलता येत नाही. काँग्रेसचा पराभव हा पराभवच आहे, यात दुमत असण्याचे कारण नाही; मात्र भाजपला जिथे जिथे धक्के बसले आहेत, तेही प्रामाणिकपणे स्वीकारावेच लागतील. निवडणुकीत विरोधक हरले की तो जनतेचा कौल आणि भाजप हरला की 'स्थानिक समीकरणे', असा दुहेरी न्याय लोकशाहीत चालत नाही.

म्हणूनच, या निवडणुकांचे निकाल केवळ काँग्रेसच्या 'शून्यापुरते' मर्यादित नाहीत. भाजपच्या दाव्यांमधील मर्यादा, विरोधकांची टिकून असलेली ताकद आणि नागपूरसारख्या गडात झालेला पराभव या वास्तवांना सामोरे जाणे आवश्यक आहे. काँग्रेसच्या शून्यावर हसणाऱ्यांनी हे विसरता कामा नये की, राजकारणात दुसऱ्याच्या शून्यावर ताशेरे ओढताना स्वतःच्या आकड्यांची बेरीज आणि वजाबाकी कधी चुकते, हे वेळेवरच लक्षात घेतलेले बरे!

स्थायी समितीकडून शहरातील कोट्यवधींच्या विकासकामांना हिरवा कंदील; रस्ते, आरोग्य आणि नागरी सुविधांच्या कामांना प्राधान्य

रावेत, आकुर्डी, पवनानगरसह विविध प्रभागांतील कामांना मंजुरी; तालेरा व वायसीएम रुग्णालयातील यंत्रणांच्या देखभालीलाही मान्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेत शहरातील विविध प्रभागांमधील रस्ते विकास, डांबरीकरण, नाला दुरुस्ती, पदपथ, सार्वजनिक स्वच्छतागृहे तसेच आरोग्य सुविधांशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. दिवंगत महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात झालेल्या या सभेत विविध विकासकामांच्या निविदा, देखभाल-दुरुस्ती आणि आवश्यक खर्चाच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. त्यामुळे शहरातील नागरी पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय झाल्याचे मानले जात आहे.

रस्ते विकास आणि डांबरीकरणाला प्राधान्य

प्रभाग क्रमांक १६ मधील रावेत परिसरात महापालिकेच्या ताब्यात आलेले डी.पी. आणि नॉन डी.पी. रस्ते विकसित करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (पीएमसी) टऊइड पद्धतीने नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. प्रभाग क्रमांक २२ मधील पवनानगर आणि आदर्शनगर परिसरातील रस्त्यांचे सन २०२६-२७ मध्ये हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्यात येणार आहे.

प्रभाग क्रमांक ६ मधील धावडेवस्ती, गुळवेवस्ती, प्रभाग क्रमांक ८ मधील विविध सेक्टर, तसेच प्रभाग क्रमांक २० मधील विशाल थिएटर, संत तुकारामनगर, कासारवाडी आणि एमआयडीसी परिसरातील रस्ते दुरुस्ती, डांबरीकरण, स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स आणि नाला दुरुस्तीच्या कामांनाही मंजुरी देण्यात आली.

आरोग्य सुविधांच्या देखभालीसाठी निर्णय

चिंचवड येथील तालेरा रुग्णालयातील एचव्हीएसी, ऑपरेशन थिएटर आणि विद्युत यंत्रणेचे पुढील दोन वर्षे चालन, देखभाल व दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. तसेच वायसीएम रुग्णालयातील एक्स-रे विभागातील डिजिटल रेडिओग्राफी सिस्टीम मशीनचा हमी कालावधी संपल्यानंतर मूळ उत्पादक कंपनीकडून थेट पद्धतीने वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार (सीएमसी) करण्यास मान्यता देण्यात आली.

पदपथ, स्वच्छतागृहे आणि नागरी सुविधांची कामे

प्रभाग क्रमांक १७ मधील आकुर्डी गावठाण परिसरात स्ट्रॉर्म वॉटर लाईन, पदपथ आणि इतर स्थापत्यविषयक कामे करण्यासाठी करारनामा करण्यास मान्यता देण्यात आली. प्रभाग क्रमांक ९ मध्ये विविध ठिकाणी पदपथ उभारणे, नेहरूनगर आणि विठ्ठलनगर परिसरातील स्थापत्य कामे, तर प्रभाग क्रमांक १० मधील शाहूनगर येथे रोड फर्निचरची कामे करण्याच्या निविदा मंजूर करण्यात आल्या.



प्रभाग क्रमांक १७, दिघी-बोपखेलमधील प्रभाग क्रमांक ४, चोविसावाडी, वडमुखवाडी, मोशी आणि डुडुळगावमधील प्रभाग क्रमांक ३ तसेच प्रभाग क्रमांक १८ मधील सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरुस्ती, पेव्हिंग ब्लॉक बसविणे, रस्ते दुरुस्ती आणि दिशादर्शक फलक उभारण्याच्या कामांनाही मान्यता देण्यात आली.

दफनभूमी आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी सुविधा

दापोडी, निगडी आणि दिघी येथील पाच मुस्लिम व लिंगायत दफनभूमींच्या देखभालीसाठी नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संबंधित धर्मादाय संस्थांना किमान वेतन दरानुसार आणखी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली. 'ड' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध कार्यक्रमांसाठी ध्वनिक्षेपण, सीसीटीव्ही, जनरेटर आणि प्रकाशव्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या निविदेला मंजुरी देण्यात आली. तसेच 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत पिंपरी आणि थेरगाव उपविभागातील कार्यक्रमांसाठीच्या निविदाही मंजूर करण्यात आल्या.

वाहनव्यवस्था आणि प्रशासकीय कामांना मुदतवाढ

प्रभाग क्रमांक १६, १७, १८ आणि २२ मधील रिक्षा-टेम्पो व्यवस्थेसाठी नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वाहन, इंधन आणि चालकासह पुढील आठ महिन्यांची मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. प्रभाग क्रमांक १५ मधील महापालिका इमारतींची स्थापत्य दुरुस्ती, फर्निचर आणि देखभाल-दुरुस्तीच्या कामांनाही मान्यता देण्यात आली.

राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत कार्यरत शहर अभियान व्यवस्थापक आणि समुदाय संघटक या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनास मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली. मात्र, या प्रस्तावात नमूद केलेली ३१ डिसेंबर २०२४ ही मुदत आणि पुढील आदेश येईपर्यंतची तरतूद याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये आधुनिक शिक्षण सुविधा

सांगवी येथील महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना दृश्याधारित शिक्षण आणि व्हर्च्युअल प्रयोगशाळेची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ई-लर्निंग मॉड्यूलवरील खर्चाच्या प्रस्तावाचे स्थायी समितीने अवलोकन केले. तसेच महिला आयटीआय, कासारवाडी येथे अतिवृष्टीमुळे आवश्यक साहित्याची तातडीने खरेदी करण्याच्या खर्चास मंजुरी देण्यात आली.

याशिवाय प्रभाग क्रमांक १९ मधील सुदर्शननगर हेल्थ क्लबजवळील जुने सी.डी. वर्क पाडून नवीन बांधणे, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे-नाशिक रोड ते सीएनजी पंपापर्यंतच्या रस्त्यावरील पथदिवे, डेकोरेटिव्ह पोल आणि हायमास्ट सुरू करण्यासाठी महावितरणला आवश्यक शुल्क अदा करणे अशा प्रस्तावांनाही मंजुरी देण्यात आली.

स्थायी समितीच्या या निर्णयांमुळे शहरातील विविध भागांमध्ये रस्ते, आरोग्य, स्वच्छता आणि नागरी सुविधांच्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा आहे. तथापि, मंजूर झालेल्या कामांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, कामांचा दर्जा आणि निर्धारित वेळेत पूर्तता यावरच या निर्णयांचे यश अवलंबून राहणार आहे.

२० वर्षीय आर्याचे प्रसंगावधान ठरले ६० ते ७० जणांसाठी जीवनरक्षक!

कुणाल मार्केटमधील भीषण आगीत जीवाची पर्वा न करता रहिवाशांना केले सावध; आर्या कांबळेला शौर्य पुरस्कार द्या : आमदार अमित गोरखे

■ पिंपरी : प्रतिनिधी

मध्यरात्रीची वेळ, सर्व रहिवासी गाढ झोपेत आणि अचानक इमारतीच्या पार्किंगमध्ये लागलेली भीषण आग धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळांमुळे संपूर्ण इमारतीत भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अशा जीवघेण्या परिस्थितीत अवघ्या २० वर्षांच्या आर्या कांबळे हिने दाखवलेले धाडस आणि प्रसंगावधान ६० ते ७० रहिवाशांसाठी जीवनरक्षक ठरले. स्वतःच्या जीवाची आणि दुखापतीची पर्वा न करता तिने संपूर्ण इमारतीतील नागरिकांना जागे करून सुरक्षित स्थळी पोहोचविण्यास मदत केली. तिच्या या धाडसी कामगिरीची शासनाने दखल घेऊन तिला शौर्य पुरस्काराने सन्मानित करावे, अशी मागणी भाजपचे विधान परिषद आमदार अमित गोरखे यांनी केली आहे.

पिंपरी-चिंचवडमधील चापेकर चौक परिसरातील कुणाल मार्केट इमारतीच्या पार्किंगमध्ये गुरुवारी (दि. २९ ऑक्टोबर) पहाटे सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत पार्किंगमधील १७ दुचाकी आणि चार चारचाकी वाहने जळून खाक झाली. मध्यरात्रीच्या वेळी आग लागल्याने इमारतीतील रहिवाशांना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येण्यापूर्वीच धूर आणि ज्वाळांचा धोका वाढला होता.

गॅलरीतून उडी मारून रहिवाशांना केले सावध

या दुर्घटनेच्या वेळी आर्या कांबळे हिच्या घराचे दार उघडत नव्हते. मात्र, अशा संकटाच्या प्रसंगीही तिने घाबरून न जाता सर्वप्रथम अग्निशमन दलाशी संपर्क साधला.

त्यानंतर परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तिने पहिल्या मजल्यावरील गॅलरीतून खाली उडी मारली. या उडीमध्ये तिच्या पायाला दुखापत झाली. तरीही स्वतःच्या वेदनांकडे दुर्लक्ष करून तिने संपूर्ण इमारतीत धाव घेतली.

गाढ झोपेत असलेल्या रहिवाशांना तातडीने जागे करून आगीची माहिती दिली. तसेच सर्वांना सुरक्षिततेच्या दृष्टीने गच्चीवर जाण्याच्या सूचना केल्या. प्रत्येक रहिवाशाला सावध करण्यासाठी तिने घेतलेली धडपड आणि स्वतःला दुखापत झाल्यानंतरही न थांबता केलेले प्रयत्न यामुळे मोठी जीवितहानी टळण्यास मदत झाली. सुमारे ६० ते ७० रहिवाशांचे प्राण वाचविण्यात तिचे प्रसंगावधान महत्त्वाचे ठरल्याचे आमदार गोरखे यांनी सांगितले.

शौर्य पुरस्काराने सन्मानित करण्याची मागणी

या घटनेबाबत आमदार अमित गोरखे म्हणाले की, मध्यरात्रीच्या वेळी संपूर्ण इमारत संकटात असताना अवघ्या २० वर्षांच्या आर्या कांबळे हिने दाखवलेले धैर्य, संयम आणि प्रसंगावधान कौतुकास्पद आहे.



स्वतःच्या पायाला दुखापत झालेली असतानाही तिने स्वतःचा विचार न करता इतरांचे प्राण वाचविण्यासाठी प्रयत्न केले. तिचे हे साहस केवळ एका कुटुंबापुरते किंवा इमारतीपुरते मर्यादित नसून संपूर्ण शहरासाठी प्रेरणादायी आहे.

अशा संकटाच्या वेळी स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांच्या मदतीला धावून जाणाऱ्या आर्या कांबळे हिच्या धाडसाची शासनाने तातडीने दखल घ्यावी. तिच्या कार्याचा अधिकृत गौरव करून तिला शौर्य पुरस्कार प्रदान करावा, अशी आग्रही मागणी आमदार अमित गोरखे यांनी केली आहे.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाला मुदतवाढ; १३ नोव्हेंबरपर्यंत दावे-हरकती दाखल करता येणार

■ मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्रातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेला भारत निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार मतदार यादीतील नावांबाबतचे दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत आता १३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच दावे आणि हरकतींच्या नोटीस टप्प्यातील कार्यवाही व त्यांचा निपटारा करण्यासाठी २५ नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली असून, अंतिम मतदार यादी ३० नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार, दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी १३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत असेल. नोटीस टप्पा आणि दावे-हरकतींचा निपटारा २७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर ३० नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल.

महाराष्ट्रासह १९ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये १ ऑक्टोबर २०२६ ही पात्रता तारीख निश्चित करून विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. मतदारांना आपले नाव, तपशील तसेच मतदार यादीतील नोंदी तपासून आवश्यक दावे व हरकती दाखल करण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सेवेतून १७ अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

सहआयुक्त मनोज लोणकर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव; प्रदीर्घ सेवाकार्याबद्दल व्यक्त केली कृतज्ञता

■ पिंपरी : प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेत कार्यरत असताना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या अनुभव, कौशल्य आणि समर्पित वृत्तीच्या माध्यमातून शहराच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या प्रदीर्घ सेवेमुळे महापालिकेच्या कामकाजाला बळ मिळाले असून, त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील, असे प्रतिपादन सहआयुक्त मनोज लोणकर यांनी केले.

महानगरपालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत मधुकर पवळे सभागृहात ऑक्टोबर २०२६ अखेर सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले १६ आणि स्वेच्छानिवृत्ती स्वीकारलेले एक अशा एकूण १७ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहआयुक्त मनोज लोणकर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.



सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्यात सर्वांनी निरोगी, आनंदी आणि समाधानी जीवनाचा आनंद घ्यावा, अशा शुभेच्छाही लोणकर यांनी दिल्या. महापालिकेच्या विकासप्रक्रियेत दिलेल्या योगदानाबद्दल यावेळी सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमास मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, संगणक अधिकारी उज्वला गोडसे, लघुलेखक सुनीता पळसकर, मनिषा कामथे, कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी-कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

ऑक्टोबर २०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्यांमध्ये उपअभियंता (स्थापत्य) विकास घारे, लघुलेखक (उच्चस्तर) वैशाली गायकवाड, सहाय्यक प्रशासन अधिकारी रजिया खान, कार्यालय अधीक्षक सरिता मारणे, मनोज शिंदे, सिस्टर इनचार्ज हेमलता लेंभे, बबीता वळसे, इलेक्ट्रीक मोटार पंप ऑपरेटर राजेंद्र भुरे, शिपाई वनिता क्षीरसागर, रायन्ना अनमोल, मजूर नजमुल्ला सिध्दकी, चंद्रकांत जगताप, सुधीर वडमारे, भालचंद्र राव, काळूराम वाघमारे आणि अशोक शेलार यांचा समावेश आहे. तर स्वेच्छानिवृत्ती स्वीकारलेल्या सिस्टर इनचार्ज कमला गायकवाड यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप यांनी केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

दैनिक राज्य लोकतंत्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

सारांश वृत्त

राष्ट्रीय एकता दिन व भारत पर्वानिमित्त गुजरातमध्ये महाराष्ट्र पर्यटनाचे विशेष दालन

मुंबई : प्रतिनिधी

राष्ट्रीय एकता दिन आणि भारत पर्वाच्या निमित्ताने गुजरातमधील केवडिया (एकतानगर) येथे १ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित उपक्रमात महाराष्ट्र पर्यटन विभाग सहभागी होत आहे. या उपक्रमांतर्गत विभागाच्या वतीने विशेष पर्यटन दालन उभारण्यात येणार असून, त्यामाध्यमातून महाराष्ट्रातील वैविध्यपूर्ण पर्यटनस्थळे, समृद्ध सांस्कृतिक वारसा, पारंपरिक कला, खाद्यसंस्कृती आणि हस्तकलेचे दर्शन देशभरातील पर्यटकांना घडविण्यात येणार आहे. या दालनात महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटनस्थळांची माहिती देणारी माहितीपत्रके आणि पर्यटनविषयक साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच, पैठणी विणकामाचे सादरीकरण, महाराष्ट्रीय खाद्यपदार्थांचे स्टॉल, पारंपरिक खाद्यसंस्कृती आणि हस्तकलेच्या विविध वस्तू हे या दालनाचे विशेष आकर्षण असणार आहे. यासोबतच इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट संस्थेच्या किचन स्टुडिओच्या माध्यमातून खाद्यसंस्कृतीचे सादरीकरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडविण्यासाठी या उपक्रमात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येणार आहे.

ढगाळ वातावरणामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित; पाऊस मात्र हुलकावणीच देतोय!

रब्बी हंगाम धोक्यात; पिकांपेक्षा जनावरांच्या चारा-पाण्याची चिंता अधिक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, धामणी परिसरात पावसाने पाठ फिरवल्याने दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. गेल्या काही दिवसांपासून आकाशात ढगांची गर्दी होत असल्याने शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. मात्र, ढगाळ वातावरण निर्माण होऊनही पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडत आहे. रब्बी हंगाम हातातून जाण्याची भीती निर्माण झाली असून, निदान जनावरांच्या चारा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तरी सुटावा, अशी आर्त अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.



पावसाअभावी कोरडा पडलेला बंधारा.

लोणी, धामणीसह परिसरातील अनेक गावांमध्ये शेतकरी अजूनही पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. यंदाचा खरीप हंगाम कसाबसा पार पडला असून, आता रब्बी हंगामही संकटात सापडला आहे. वेळेत पाऊस न झाल्याने ज्वारीसह अन्य रब्बी पिकांच्या पेरण्या रखडल्या आहेत. जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने पेरणी करावी तरी कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. त्यामुळे यंदाच्या शेती उत्पन्नाबाबत मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे.

दरम्यान, सध्या शेतकऱ्यांना रब्बी पिकांपेक्षाही जनावरांच्या चारा आणि पिण्याच्या पाण्याची चिंता अधिक सतावत आहे. पावसाअभावी शेतातील हिरवा चारा संपत चालला असून, जनावरांसाठी चारा उपलब्ध करणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. दुसरीकडे विहिरी, बंधारे आणि अन्य जलस्रोतांची पाणीपातळी खालावत चालल्याने जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनण्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांपासून आकाशात ढग जमा होत आहेत. त्यामुळे पाऊस पडेल, या आशेने शेतकरी दररोज आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत. मात्र, ढगाळ वातावरणापुरतीच निसर्गाची साथ मिळत असून प्रत्यक्ष पावसाचा थेंबही पडत नसल्याने शेतकऱ्यांची प्रतीक्षा कायम आहे. निदान आता तरी जोरदार पाऊस पडून जमिनीतील ओलावा वाढावा, जलस्रोतांना पाणी मिळावे आणि जनावरांच्या चारा-पाण्याची समस्या कमी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

रब्बी हंगामाची आशा जवळपास मावळत असताना शेतकऱ्यांसमोर आता जनावरे जगविण्याचे आव्हान उभे राहिले आहे. शेतीचे नुकसान झाले तरी जनावरांच्या चारा-पाण्याची व्यवस्था कशी करायची, हा प्रश्न त्यांना भेडसावत आहे. त्यामुळे रब्बी पिकांसाठी नाही, तर निदान जनावरांच्या जगण्यासाठी तरी पावसाने हजेरी लावावी, अशी आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांची आर्त हाक आहे.

भैरवनाथ विद्यालयाचा खो-खो स्पर्धेत डंका!

जिल्हास्तरीय स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलींच्या संघाची दमदार कामगिरी; विभागीय स्पर्धेसाठी निवड



■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

कुरकुंभ (ता. दौंड) येथे आयोजित जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत शिंगवे (ता. आंबेगाव) येथील श्री भैरवनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघावर मात केली. सांघिक समन्वय, चपळता, वेगवान हालचाली आणि अचूक नियोजनाच्या जोरावर मिळविलेल्या या यशामुळे विद्यालयासह शिंगवे गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या यशस्वी संघात धनश्री करे, प्रतीक्षा कचरे, अनुजा करंडे, काजल वाव्हळ, दीक्षा पाबळे, आराध्या गोरडे, तनिष्का बांगर, अर्चना करगळ, नंदिनी सोनवणे, स्वरा टाके, पायल धोत्रे, मनीषा ढेकळे, संजीवनी शिंदे, प्रज्ञा सोनवणे आणि रुद्रा वाव्हळ या खेळाडूंचा समावेश आहे. या खेळाडूना विद्यालयाचे प्राचार्य डी. एन. खाडे, तानाजी फुलमाळी, प्रा. शिवदत्त जोरी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या मेहनतीला आणि जिद्दीला मिळालेल्या यशाबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. आगामी विभागीय स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छाही देण्यात आल्या.

तहसीलदारांच्या कथित असभ्य वर्तनावर तलाठी संघटना आक्रमक!

वेतनविलंब, अपमानास्पद भाषा आणि कर्मचाऱ्यांवरील दबावाचे आरोप; जिल्हाधिकारी चौकशी समिती नेमणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

संगमनेर (प्रतिनिधी) :

तहसील कार्यालयातील कथित मनमानी कारभार आणि तहसीलदार धीरज मांजरे व तलाठी संघटनेतील संघर्षामुळे महसूल विभागातील वातावरण तापले आहे. अपमानास्पद वागणूक, अर्वाच्च भाषेचा वापर, वेतनातील विलंब आणि कर्मचाऱ्यांवर दबाव आणल्याचे गंभीर आरोप महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेने केले आहेत. याप्रकरणी संघटनेने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.



या वादात तालुकाध्यक्ष प्रताप ओतारी यांनीही तहसीलदारांकडून असभ्य वर्तन झाल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे तहसील कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्यातील संघर्ष चव्हाट्यावर आला आहे.

वेतनाच्या प्रश्नावरून सुरू झालेल्या वादाला कथित अपमानास्पद वागणुकीची किनार मिळाल्याने तलाठी संघटना आक्रमक झाली आहे. तहसील कार्यालयातील कामकाजात हस्तक्षेप, नोटिसांची धमकी आणि कर्मचाऱ्यांवर दबाव आणला जात असल्याचे आरोप संघटनेने निवेदनातून केले आहेत. या प्रकरणी प्रांताधिकारी अरुण उंडे आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे दाद मागण्यात आली. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती नेमण्याचे आश्वासन दिल्यानंतर संघटनेने आंदोलनाची पुढील रणनीती ठरविण्यासाठी काही काळ प्रतीक्षा करण्याची भूमिका घेतली आहे.

तालुकाध्यक्ष विक्रम ओतारी यांनी संघटनेची भूमिका मांडताना कर्मचाऱ्यांना न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. आता जिल्हाधिकाऱ्यांकडून नेमण्यात येणाऱ्या चौकशी समितीचा अहवाल काय येतो आणि त्यानंतर प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

औषधनिर्मितीतील गुणवत्ता यंत्रणाच अपयशी! सन फार्माच्या आसाममधील कारखान्याला टाळे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

औषधांच्या गुणवत्तेबाबत गंभीर त्रुटी आढळल्याने देशातील आघाडीची औषधनिर्मिती कंपनी सन फार्माला मोठा धक्का बसला आहे. आसाममधील कंपनीच्या उत्पादन प्रकल्पात गुणवत्ता व्यवस्थापन यंत्रणाच अपयशी ठरल्याचे समोर आल्यानंतर केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटना (ड्रग्ज) आणि आसामच्या औषध नियंत्रक कार्यालयाने डोळ्यांशी संबंधित औषधांचे उत्पादन थांबवण्याचे आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे, या कारवाईत केवळ उत्पादनच नव्हे, तर संबंधित औषधांची विक्री आणि वितरणावरही बंदी घालण्यात आली आहे.

२० ऑगस्ट रोजी हा आदेश जारी करण्यात आला होता. केंद्र



आणि राज्याच्या औषध नियंत्रण यंत्रणांनी संयुक्तपणे आसाममधील उत्पादन प्रकल्पाची तपासणी केली होती. या तपासणीत औषधांची गुणवत्ता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीमध्ये गंभीर त्रुटी आढळल्या.

या प्रकरणाची पार्श्वभूमीही चिंताजनक आहे. संबंधित तपासणीपूर्वीच जुलै महिन्यात सन फार्माने स्वतःहून डोळ्यांच्या उपचारांसाठी वापरल्या जाणाऱ्या सुमारे ११ ब्रँडची औषधे बाजारातून परत मागवली होती. त्यानंतर नियामक यंत्रणांनी केलेल्या तपासणीत गुणवत्ता व्यवस्थापनातील त्रुटी समोर आल्या. औषध नियंत्रकांच्या कागदपत्रांनुसार, कंपनीला एकूण ३३२ बॅचेस बाजारातून परत मागवाव्या लागल्या आहेत.

डोळ्यांसारख्या अत्यंत संवेदनशील अवयवाच्या उपचारांसाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांच्या गुणवत्तेत त्रुटी आढळणे ही गंभीर बाब आहे. अशा औषधांच्या निर्मितीत स्वच्छता, सुरक्षितता आणि गुणवत्ता नियंत्रणाचे कठोर निकष पाळणे आवश्यक असते.

औषधनिर्मिती क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांच्या बाबतीतही गुणवत्ता नियंत्रणात तडजोड झाल्यास त्याची किंमत थेट रुग्णांना मोजावी लागू शकते. त्यामुळे या प्रकरणात नियामक यंत्रणांची पुढील कारवाई आणि रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी उचलली जाणारी पावले महत्त्वाची ठरणार आहेत.

दुष्काळी तालुक्यांतील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कमाफीचा आदेश कागदावरच?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

ठाकरे पिता-पुत्रांच्या तुरुंगवासाचे भाकीत! नितेश राणेंचा राजकीय बॉम्ब; एप्रिल-मेचा मुहूर्त सांगितला

मुंबई / प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात ठाकरे कुटुंबाला थेट लक्ष्य करत मंत्री नितेश राणे यांनी खळबळजनक विधान केले आहे. एप्रिल-मे महिन्यात उद्धव ठाकरे किंवा आदित्य ठाकरे तुरुंगात असतील, असा दावा राणे यांनी केला. कोणत्या प्रकरणात आणि कोणत्या आधारावर हा दावा केला, याचा तपशील त्यांनी दिलेला नसला, तरी त्यांच्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात नव्या वादाला तोंड फुटले आहे.

शिवसेना शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर यांनी राज्याच्या हितासाठी एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे एकत्र येऊ शकतात, असे विधान केले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना राणे यांनी वरिष्ठांनी या वक्तव्याची दखल घेतली असून त्यांच्या निर्णयाची वाट पाहणार असल्याचे सांगितले.

संजय राऊत यांच्यावरही त्यांनी जोरदार निशाणा साधला. राऊत यांची आतापर्यंतची कोणतीही भाकिते खरी ठरलेली नाहीत, असा टोला लगावत त्यांनी उपरोधिक टीका केली.

उद्धव ठाकरे यांनी राजकारणाऐवजी फोटोग्राफी केली असती, तर बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाची अशी अवस्था झाली नसती, असेही राणे म्हणाले. ठाकरे बंधूंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सल्ला ऐकावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

राज ठाकरेंना आम्ही कधी नाराज केले नाही आणि पुढेही करणार नाही, असे स्पष्ट करत २०२९ पर्यंत देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री राहतील, असा दावा त्यांनी केला. ठाकरे पिता-पुत्रांच्या अटकेच्या दाव्याने आता सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्षाला नवे वळण मिळण्याची चिन्हे आहेत.

७० नागरिकांचे प्राण वाचविणाऱ्या २० वर्षीय आर्या कांबळेचा महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत विशेष सन्मान

कुणाल मार्केटमधील भीषण आगीत दाखविले प्रसंगावधान; नागरिकांना वेळीच सावध करून टेरेसवर जाण्याच्या दिल्या सूचना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी : प्रतिनिधी

चिंचवड येथील चाफेकर चौक परिसरातील कुणाल मार्केट इमारतीच्या पार्किंगमध्ये लागलेल्या भीषण आगीत प्रसंगावधान राखत सुमारे ७० नागरिकांचे प्राण वाचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या २० वर्षीय कु. आर्या विजय कांबळे हिचा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत विशेष सन्मान करण्यात आला. स्वतःच्या सुरक्षिततेची पर्वा न करता इमारतीतील नागरिकांना वेळीच सावध करून तिने दाखविलेल्या धाडसाचे सभागृहात कौतुक करण्यात आले.

चिंचवडमधील कुणाल मार्केट इमारतीमध्ये सुमारे ४० दुकाने आणि ३८ सदनिका आहेत. या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर पहाटे दीडच्या सुमारास आग लागल्याचे आर्याच्या निदर्शनास आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तिने आरडाओरडा करत इमारतीतील रहिवाशांना जागे केले. नागरिकांना तातडीने टेरेसवर जाण्याच्या सूचना दिल्या. तसेच अग्निशमन विभागाला आगीची माहिती कळविली.

दरम्यान, अग्निशमन दलाचे पथक काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले. आगीमुळे टेरेसवर अडकलेल्या



नागरिकांना शेजारील इमारतीत सुरक्षितपणे हलविण्यात आले. आर्याने वेळीच दिलेला इशारा, नागरिकांना केलेले मार्गदर्शन आणि दाखविलेल्या समयसूचकतेमुळे सुमारे ७० नागरिकांचे प्राण वाचविण्यास मदत झाली. या घटनेत तिच्या धाडसाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

आर्या कांबळे ही आकुर्डी येथील डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीमध्ये डिझाइन विषयाच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत आहे.

वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी संकटाच्या प्रसंगी घाबरून न जाता इतरांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत तिने दाखविलेली सामाजिक बांधिलकी विशेष उल्लेखनीय ठरली.

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत तिचा विशेष सन्मान करून तिच्या धाडसी कार्याची दखल घेण्यात आली. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, अतिरिक्त आयुक्त डॉ. कुलदीप जंगम यांच्यासह अन्य पदाधिकारी, नगरसदस्य आणि अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

संकटसमयी दाखविलेल्या धैर्याचा गौरव

आगीसारख्या आपत्कालीन परिस्थितीत काही क्षणांचे प्रसंगावधान अनेकांचे जीव वाचवू शकते, याचे उदाहरण आर्या कांबळे हिने घालून दिले आहे. नागरिकांना वेळीच सावध करणे, सुरक्षित ठिकाणी जाण्याच्या सूचना देणे आणि अग्निशमन दलाला माहिती देणे या कृतींमधून तिचे धाडस आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधोरेखित झाली. महानगरपालिकेने केलेला हा सन्मान तिच्या कार्याची अधिकृत दखल घेणारा ठरला.

सारांश वृत्त

दुष्काळात जनावरांचा चारा तरी महागाईच्या कचाट्यातून बाहेर?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी

दुष्काळाने शेतकऱ्यांचे पीक उद्ध्वस्त केले, उत्पन्नाचे साधन हिरावले आणि आता पशुधनाच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत जनावरांना जगवण्यासाठी शेतकऱ्यांना चाऱ्यासाठी किती खर्च करावा लागणार, हा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. अखेर राज्य सरकारने सुक्या चाऱ्याचा कमाल आधारभूत दर प्रतिकिलो १२ रुपये आणि मुरघासाचा दर आठ रुपये निश्चित केला आहे. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी ही माहिती दिली. राज्यात आतापर्यंत ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे आगामी काळात चारा टंचाईचे संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीने अभ्यासगट स्थापन केला होता. पंकजा मुंडे या गटाच्या सदस्य होत्या. राज्यासह अन्य राज्यांतील चारा व्यवस्थापनाचा अभ्यास करून उपलब्धता, संभाव्य उत्पादन आणि गरज यांचा आढावा घेण्यात आला. या अहवालाला २७ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. हे दर वाहतूक खर्च वगळून लागू असतील. सुक्या चार्यातील ओलावा १५ टक्क्यांपेक्षा अधिक नसावा. चाऱ्यात बुरशी, कीड, माती किंवा कुबट वास नसावा. ज्वारी आणि बाजरीच्या चार्याला प्राधान्य दिले जाणार आहे. मुरघासाचा ओलावा ६२ ते ७० टक्के, सामू ३.५ ते ४.४ आणि क्रूड प्रोटीन किमान सात टक्के असणे आवश्यक आहे. भारतीय मानक ब्युरोच्या आयएस १९५६२ : २०२६ मधील अन्य निकषही लागू राहतील.

हे दर दुष्काळाच्या कालावधीपुरते लागू असतील. मात्र, केवळ दर जाहीर करून सरकारची जबाबदारी संपणार नाही. चारा प्रत्यक्ष पशुपालकांपर्यंत पोहोचतो का, खरेदीत गैरव्यवहार होतो का आणि शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळते का, याची खरी परीक्षा आता जिल्हा प्रशासनाची आहे.

भूतानमध्ये हिमनदीचे सरोवर फुटले; बंगालमध्ये पुराचा धोका, ४ हजार नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
कोलकाता : प्रतिनिधी

हिमनदीच्या सरोवराचा बांध फुटल्याने अचानक आलेल्या पुराच्या संकटाने पश्चिम बंगाल आणि भूतानच्या सीमावर्ती भागात चिंता वाढवली आहे. भूतानमध्ये ग्लेशियल लेक आउटबर्स्ट फ्लड (ञ्हजञ्ज) अर्थात हिमनदीच्या सरोवरातून अचानक पाण्याचा प्रचंड विसर्ग झाल्याची घटना घडली. त्यानंतर पश्चिम बंगालमधील दार्जिलिंगच्या डोंगराळ भागासह डुआर्स परिसरात पूरस्थितीचा इशारा देण्यात आला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून आतापर्यंत सुमारे चार हजार नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे.

३० ऑक्टोबर २०२६ रोजी या परिस्थितीबाबत प्रशासनाने सतर्कतेचे आदेश दिले. विशेषतः संकोश नदी आणि तिच्या सर्व उपनद्यांच्या पाणलोट क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांना तातडीने सुरक्षित स्थळी जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. हिमनदीच्या सरोवरातून अचानक मोठ्या प्रमाणात पाणी बाहेर पडल्यास नदीच्या पाणीपातळीत वेगाने वाढ होऊ शकते. त्यामुळे सीमावर्ती भागातील गावांना संभाव्य पुराचा धोका निर्माण झाला आहे.

दरम्यान, पश्चिम बंगालचे



मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी परिस्थिती सध्या पूर्णपणे सामान्य असल्याचे सांगितले आहे. पहाटे चार वाजेपर्यंत पोलीस अधीक्षक, मंत्री, आमदार आणि जिल्हाधिकारी घटनास्थळी उपस्थित राहून परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. प्रशासनाच्या नियंत्रण कक्षाशीही त्यांचा सातत्याने संपर्क होता, असे त्यांनी स्पष्ट केले.

सध्या संकटाची पातळी धोक्याच्या मर्यादेपेक्षा खूपच खाली असून परिस्थिती 'ग्रीन झोन'मध्ये असल्याचा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. सकाळी बेपत्ता असल्याची माहिती मिळालेल्या ४७ नागरिकांशीही संपर्क झाला असून ते सर्व सुरक्षित असल्याचे त्यांनी सांगितले.

मात्र, सध्या परिस्थिती नियंत्रणात असली तरी हिमनदीच्या सरोवरातून निर्माण होणाऱ्या पुराचा धोका पूर्णपणे टळलेला नाही. त्यामुळे प्रशासनाने स्थलांतर आणि सतर्कतेच्या उपाययोजना सुरू ठेवल्या आहेत.

हवामानातील बदल आणि हिमनद्यांशी संबंधित वाढते धोके लक्षात घेता हिमालयीन प्रदेशातील मानवी वस्तीच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

निवडणुकीत बहुमत गेले, आता 'मतचोरी'चा आरोप! नेतान्याहूंच्या पक्षाकडून अरबांवर निशाणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
जेरुसलेम : प्रतिनिधी

निवडणुकीत अपेक्षित बहुमत मिळाले नाही की लोकशाही प्रक्रियेवरच प्रश्न उपस्थित करायचे, असा प्रकार इस्रायलमध्ये पाहायला मिळत आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या पक्षाने अरब नेतृत्वाखालील पक्षांवर निवडणूक चोरल्याचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे, या आरोपांना पुष्टी देणारे कोणतेही ठोस पुरावे समोर आलेले नसतानाही पक्षाकडून हे आरोप पुढे रेटले जात आहेत.

इस्रायलमधील अंतिम निवडणूक निकालांत नेतान्याहू यांच्या राजकीय आघाडीला संसदेतील बहुमत गमवावे लागले आहे. त्यामुळे सत्तास्थापनेचे राजकीय गणित बदलले असून विरोधी पक्षांसमोर नवे पर्याय निर्माण झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर नेतान्याहू यांच्या पक्षाने अरब नेतृत्वाखालील पक्षांवर निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप केल्याचा आरोप केला आहे. यात परकीय शक्तींची मदत घेतल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला. इस्रायली माध्यमांच्या वृत्तानुसार, या आरोपांमध्ये कतारचे नावही पुढे करण्यात आले आहे. हमासचा समर्थक देश म्हणून अनेक इस्रायली नागरिक कतारकडे पाहतात. मात्र, निवडणुकीत कतारचा हस्तक्षेप झाल्याचा आरोप सिद्ध झालेला नाही.

दुसरीकडे, विरोधकांनी नेतान्याहू यांच्यावर अरब नागरिकांना लक्ष्य करून निवडणुकीच्या निकालाची वैधता संशयास्पद ठरवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे. अरब नेतृत्वाखालील पक्षांनी यंदा ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

विरोधी पक्षांनी अरब पक्षांसोबत आघाडी केल्यास संसदेत बहुमताचे समीकरण तयार होऊ शकते. मात्र, असा निर्णय इस्रायलच्या राजकारणात दुर्मीळ आणि राजकीयदृष्ट्या आव्हानात्मक ठरणार आहे.

एकीकडे निवडणुकीचा कौल, तर दुसरीकडे निकालांवरच संशय व्यक्त करणारे आरोप, यामुळे इस्रायलमध्ये लोकशाही प्रक्रियेची विश्वासार्हता आणि अरब नागरिकांच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

मुदतबाह्य मालावर तारीख बदलून ग्राहकांच्या जिवाशी खेळ? तुकाराम मुंढेंचा कंपन्यांना दणका!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी

मुदत संपलेले अन्नपदार्थ नष्ट करण्याऐवजी त्यांची तारीख बदलून पुन्हा ग्राहकांच्या माथी मारण्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने कंपन्यांविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहे.

मुदतबाह्य माल नष्ट केल्याचे केवळ कागदोपत्री प्रमाणपत्र दाखवून सुटका करून घेण्याचे दिवस आता संपले आहेत. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी प्रत्यक्ष माल नष्ट केल्याचे ठोस पुरावे सादर करणे बंधनकारक करणारे नवे आदेश जारी केले आहेत.

काही कंपन्या मुदत संपलेल्या अन्नपदार्थांचे पॅकिंग बदलून किंवा एक्सपायरी डेटमध्ये फेरफार करून तोच माल पुन्हा बाजारात विक्रीस आणत असल्याचे तपासात उघड



झाले. काही ठिकाणी दलालांच्या माध्यमातून माल नष्ट केल्याची बनावट प्रमाणपत्रे मिळवून प्रत्यक्षात मालाची पुनर्विक्री केली जात असल्याचेही समोर आले.

या प्रकारांना आळा घालण्यासाठी एफडीएने २२ मुद्द्यांची नियमावली लागू केली आहे. हॉटेल्स, दूध व दुग्धजन्य पदार्थ, खाद्यतेल आणि शाळांमधील खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे.

गेल्या १५ दिवसांत भिवंडी आणि वडपे परिसरात धडक कारवाई करण्यात आली. भिवंडीत ८० हजार आणि त्यानंतर २६ लाख रुपयांचा माल जप्त करण्यात आला. वडपेतील दोन आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले. एकूण कारवाईत सुमारे पाच कोटी रुपयांचा माल जप्त झाला असून, दहा कारवायांच्या अनुषंगाने दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मालकांसह ३२ जणांवर कारवाई झाली आहे.

प्रत्येक खाद्यपदार्थाच्या पॅकिंगवर एक्सपायरी डेट असणे बंधनकारक आहे. दिवाळीत कालबाह्य पदार्थ विकणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा मुंढे यांनी दिला आहे.

बद्रीनाथहून उड्डाण, जोशीमठजवळ काळाचा घाला! हेलिकॉप्टर दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र
चेन्नई । प्रतिनिधी

उत्तराखंडमधील चारधाम यात्रेच्या मार्गावर पुन्हा एकदा भीषण हेलिकॉप्टर दुर्घटना घडली आहे. बद्रीनाथहून डेहराडूनच्या दिशेने निघालेले खासगी हेलिकॉप्टर जोशीमठजवळ डोंगराच्या उतारावर कोसळले. या दुर्घटनेत वैमानिकासह हेलिकॉप्टरमधील सर्व सहा जणांचा मृत्यू झाला आहे.

शुक्रवारी, ३० ऑक्टोबर २०२६ रोजी ही दुर्घटना घडली. ढअॅरपी इहरअॅरी अॅिळरीळेप झ्रीीं. डींव. या खासगी कंपनीचे हेलिकॉप्टर बद्रीनाथ येथून डेहराडूनच्या दिशेने रवाना झाले होते. उड्डाणानंतर साधारण एका तासाने चमोली जिल्ह्यातील जोशीमठजवळ हेलिकॉप्टर डोंगराच्या उतारावर आदळून कोसळले. या अपघाताची माहिती मिळताच बचाव यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली.

चमोलीचे जिल्हाधिकारी गौरव कुमार यांनी या दुर्घटनेत हेलिकॉप्टरमधील सर्व सहा जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची अधिकृत माहिती दिली. मृतांमध्ये वैमानिक कॅप्टन हिमांशू यांच्यासह पाच प्रवाशांचा समावेश आहे. प्रतापा, अरुण, शंकर गौडा, सुधीर के. आणि एच. एस. नटराजा अशी मृत प्रवाशांची नावे आहेत.

दुर्घटनेची माहिती मिळताच राज्य आपत्ती प्रतिसाद दल अर्थात एसडीआरएफ, सुरक्षा यंत्रणा आणि अन्य बचाव पथकांनी घटनास्थळी शोध व बचावकार्य सुरू केले. भारतीय लष्कराचे पथकही घटनास्थळी पोहोचले. या पथकाने हेलिकॉप्टरमधील सर्व सहा जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली.

या दुर्घटनेमुळे उत्तराखंडमधील हेलिकॉप्टर वाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेषतः डोंगराळ भागातील प्रतिकूल हवामान, अवघड भौगोलिक परिस्थिती आणि हेलिकॉप्टर उड्डाणांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.



मात्र, या हेलिकॉप्टर दुर्घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अपघातामागे तांत्रिक बिघाड, हवामान की अन्य काही कारण होते, याचा तपास झाल्यानंतरच वास्तव समोर येणार आहे. सहा जणांचा बळी घेणाऱ्या या दुर्घटनेने उत्तराखंडमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेतील नाट्यलेखन पारितोषिके जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने आयोजित ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील नवीन नाट्यसंहितांचे परीक्षण करण्यात आले असून, उत्कृष्ट नाट्यलेखनासाठी नाट्यलेखकांना पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.

प्राथमिक फेरीतील नवीन नाट्यसंहितांच्या परीक्षणानंतर 'इम्युनिटी (द व्हॉईस ऑफ टॉलरन्स)' या नाट्यसंहितेसाठी डॉ. सोमनाथ सोनवलकर यांना प्रथम पारितोषिक जाहीर करण्यात आले असून, त्यांना रु. ६०,०००/- रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. 'लुई ढागेरी ते पिकासो' या नाट्यसंहितेसाठी डॉ. श्याम शिंदे यांना द्वितीय पारितोषिक रु. ४०,०००/-, तर 'मिसेस हिटलर' या नाट्यसंहितेसाठी रोहन टिल्लू यांना तृतीय पारितोषिक रु. २०,०००/- जाहीर करण्यात आले आहे.

महाराष्ट्राला नाट्यकलेची समृद्ध आणि प्रदीर्घ परंपरा लाभली असून, राज्यस्तरीय नाट्य स्पर्धांच्या माध्यमातून विविध विषयांवरील दर्जेदार नाट्यलेखनाला प्रोत्साहन मिळते. नवीन नाट्यसंहितांच्या माध्यमातून समकालीन विषय, सामाजिक वास्तव आणि विविध मानवी पैलू रंगभूमीवर प्रभावीपणे मांडले जातात. अशा नाट्यलेखनाची दखल घेऊन नाट्यलेखकांच्या सर्जनशील योगदानाचा गौरव करणे हा या पारितोषिकांचा प्रमुख उद्देश आहे.

६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील नवीन नाट्यसंहितांचे परीक्षण तज्ज्ञ परीक्षकांकडून करण्यात आले. त्यातून उत्कृष्ट लेखन, आशय, मांडणी आणि नाट्यगुणांचा विचार करून वरील नाट्यसंहितांची पारितोषिकांसाठी निवड करण्यात आली आहे. या पारितोषिकांमुळे नाट्यलेखकांना



प्रोत्साहन मिळून मराठी रंगभूमीसाठी दर्जेदार आणि आशयपूर्ण नवीन नाट्यलेखनाला चालना मिळणार आहे.

ही स्पर्धा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्राच्या समृद्ध नाट्यपरंपरेचे जतन, संवर्धन आणि विकास करण्यासोबतच नव्या पिढीतील नाटककार, कलाकार, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञांना प्रोत्साहन देण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध नाट्यविषयक स्पर्धा व उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.

या पारितोषिकप्राप्त नाट्यसंहितांचे लेखक आणि त्यांच्या सर्जनशील लेखनाचा गौरव 'नाट्यगौरव' राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ सोमवार, २ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. या समारंभास नाट्यलेखक, कलाकार, दिग्दर्शक, रंगकर्मी तसेच नाट्यरसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पारितोषिकप्राप्त कलावंतांचा गौरव आणि मराठी रंगभूमीच्या समृद्ध परंपरेचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

न्यायालयात युक्तिवाद कमी, सोशल मीडियावर प्रसिद्धीचा हव्यास जास्त? अलाहाबाद हायकोर्टाने तरुण वकिलांना सुनावले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
प्रयागराज । प्रतिनिधी

न्यायालयीन कामकाजात व्यत्यय, वकील आणि न्यायाधीशांमधील मतभेद तसेच बार आणि बेंचमधील वाढता तणाव या पार्श्वभूमीवर अलाहाबाद उच्च न्यायालयाने तरुण वकिलांना महत्त्वाचा संदेश दिला आहे. न्यायालयात स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी सोशल मीडियावरील लाईक्स आणि प्रसिद्धीच्या मागे धावण्यापेक्षा कायद्याचा सखोल अभ्यास करा, प्रकरणांची व्यवस्थित तयारी करा आणि आपल्या व्यावसायिक कौशल्यावर लक्ष केंद्रित करा, असा स्पष्ट सल्ला न्यायालयाने दिला आहे.

३० ऑक्टोबर २०२६ रोजी न्यायमूर्ती अरुण कुमार सिंह देशवाल यांच्या खंडपीठाने हा सल्ला दिला. न्यायालयीन कामकाजात होणारे अडथळे आणि वकील संघटना व न्यायाधीश यांच्यातील वाढते मतभेद याबद्दल खंडपीठाने चिंता व्यक्त केली. न्यायालय ही केवळ प्रसिद्धी मिळवण्याची जागा नसून कायद्याचा अभ्यास, युक्तिवादातील गुणवत्ता आणि न्यायप्रक्रियेप्रती असलेल्या जबाबदारीची कसोटी असते, हा या निरीक्षणाचा महत्त्वाचा आशय आहे.

न्यायालयाने विशेषतः तरुण वकिलांच्या भूमिकेवर भर दिला. आजचे तरुण वकील हे उद्याच्या उच्च न्यायालयाचे भविष्य आहेत. याच तरुण वकिलांमधून पुढे वरिष्ठ वकील आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश तयार होणार आहेत, असे खंडपीठाने नमूद केले.

त्यामुळे वकिलीच्या सुरुवातीच्या टप्प्यातच व्यावसायिक शिस्त, अभ्यासाची सवय आणि प्रकरणांचा सखोल अभ्यास विकसित करणे आवश्यक असल्याचा संदेश न्यायालयाने दिला.

जामीन अर्जाच्या सुनावणीत न्यायालयीन कामकाजात अडथळे

या निरीक्षणामागे एक विशिष्ट घटना होती. 'राजेश विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार' या जामीन अर्जावर सुनावणी सुरू असताना काही वकिलांनी इतर वकिलांना त्यांचे खटले मांडण्यासाठी न्यायालयात प्रवेश करण्यापासून जबरदस्तीने रोखल्याचा आरोप समोर आला. सरकारी वकिलांनाही न्यायालयाच्या कक्षातून जबरदस्तीने बाहेर काढण्यात आल्याची बाब खंडपीठाने नोंदवली.

न्यायमूर्ती देशवाल यांनी आपल्या आदेशात एका महिला वकिलाचा उल्लेख केला. ती आपल्या प्रकरणाच्या सुनावणीसाठी न्यायालयात प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होती. मात्र, तिच्याशी गैरवर्तन करून तिला जबरदस्तीने रोखण्यात आल्याचे न्यायालयाने नमूद केले. तिच्या आक्रोशाचे आवाज सुनावणीदरम्यान ऐकू आल्याचेही न्यायमूर्तींनी आदेशात नोंदवले.

यावर न्यायालयाने स्पष्ट केले की, काही वकिलांना न्यायालयाचे कामकाज चालू नको असले, तरी बहुतांश वकिलांना आपली प्रकरणे मांडायची असताना न्यायालयीन कामकाज ठप्प ठेवता येणार नाही. बारमधील एका गटाच्या भूमिकेमुळे इतर वकिलांचा न्याय मिळवण्याचा आणि आपली बाजू मांडण्याचा अधिकार हिरावला जाऊ शकत नाही.

सोशल मीडियावरील अपुऱ्या माहितीवरही न्यायालयाची चिंता

या प्रकरणात न्यायालयाने तरुण वकिलांनी सोशल मीडियावर टाकलेल्या काही पोस्टचीही न्यायालयीन दखल घेतली. उच्च न्यायालयाच्या कामकाजाबाबत आणि वकिलांच्या भूमिकेबाबत अपूर्ण किंवा चुकीच्या पद्धतीने मांडलेली माहिती विचार न करता प्रसारित केल्यास बार आणि बेंचमधील मतभेद अधिक तीव्र होऊ शकतात, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले.

न्यायाधीश आणि वरिष्ठ वकील तरुण वकिलांसाठी चांगले वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचेही न्यायालयाने म्हटले. मात्र, सोशल मीडियावरील पोस्ट, व्हिडिओ आणि प्रसिद्धीच्या माध्यमातून न्यायालयीन व्यवस्थेबाबत चुकीचे चित्र निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्याची जबाबदारी वकिलांवरही आहे.

न्यायालयाची प्रतिष्ठा केवळ न्यायाधीशांची जबाबदारी नाही!

न्यायालयाने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला. उच्च न्यायालयावर सर्वसामान्य जनतेचा विश्वास आहे म्हणूनच समाजात वकिलांना प्रतिष्ठा मिळते. हा विश्वासच डळमळीत झाला, तर काही माफिया आणि बेजबाबदार सरकारी अधिकारी वकिलांचा छळ करण्यास पुढे येतील, अशी चिंता न्यायालयाने व्यक्त केली. अलीकडे काही जिल्ह्यांमध्ये अशा घटना घडल्याचा उल्लेखही करण्यात आला.

विशेष म्हणजे, न्यायालयाने सरकारी वकिलांनाही बारचाच एक भाग मानले. त्यामुळे खासगी वकील असो किंवा सरकारी वकील, दोघांच्याही प्रतिष्ठेचे संरक्षण झाले पाहिजे, असे स्पष्ट केले. अलाहाबाद हायकोर्ट बार असोसिएशनच्या नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी या प्रश्नात लक्ष घालून योग्य पावले उचलावीत, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

दरम्यान, या घडामोडींमुळे संबंधित जामीन अर्जाची सुनावणी पुढे ढकलण्यात आली असून, प्रकरण २६ नोव्हेंबर २०२६ रोजी पुन्हा सूचीबद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.